भतवाल हॉस्पिटल म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN


संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२४ ■ गुरूवार २७ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26




## देशांतर्गत सुरक्षेशिवाय विकसित भारतचे स्वप्न अशक्य
## भारताला धर्मशाळा समजू नये, अमित शाहांचा इशारा

**नवी दिल्ली, दि.२६- भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय मजबूत देशांतर्गत सुरक्षेच्या पायावरच अवलंबून असल्याचा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला. घुसखोरी, दहशतवाद, मादक पदार्थांची तस्करी आणि इतर सुरक्षा आव्हानांविरोधात कठोर व प्रभावी पावले उचलण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. दिल्ली येथे इंटेलिजन्स ब्युरोच्या राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषदेच्या निरोप सत्रात ते बोलत होते. देशाच्या सुरक्षेशी तडजोड केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देताना शहा यांनी घुसखोरीच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष वेधले.**



देशांतर्गत सुरक्षा अधिक मजबूत केल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही, असे शहा म्हणाले. पूर्वीच्या सरकारांनी अमली पदार्थांची तस्करी, नक्षलवाद आणि ईशान्येकडील असंतोष यासारख्या आव्हानांचा वेळीच अंदाज घेतला असता, तर देशाला अनेक दशकांच्या सुरक्षा आणि प्रशासकीय आव्हानांचा सामना करावा लागला नसता, असेही त्यांनी नमूद केले.

**तीन सुरक्षा हॉटस्पॉट्सवर मात**

देशातील तीन प्रमुख अंतर्गत सुरक्षा हॉटस्पॉट्समुळे निर्माण झालेल्या धोक्यांवर भारताने यशस्वीपणे मात केली असल्याचे शहा यांनी सांगितले. या यशाचे श्रेय त्यांनी राज्य पोलीस दल, केंद्रीय सुरक्षा यंत्रणा आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांना दिले. देशाच्या सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करणे आवश्यक असून, बदलत्या काळानुसार निर्माण होणाऱ्या नव्या आव्हानांचा वेळीच सामना करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**आव्हानांवर लक्ष केंद्रित करा**

गुप्तचर आणि सुरक्षा यंत्रणांनी केवळ सध्याच्या धोक्यांपुरते मर्यादित न राहता, पुढील पंधरा ते वीस वर्षांत देशाच्या सुरक्षा वातावरणाला आकार देऊ शकणाऱ्या नव्या (पान ४ वर)

### नेपाळमध्ये जलप्रलय
### अनेक मृत, शेकडो बेपत्ता

काठमांडू, दि. २६ : नेपाळमध्ये बुधवारी आलेल्या भीषण अचानक पुरामुळे मोठी जीवित आणि वित्तहानी झाली आहे. तिबेटच्या दिशेने आलेल्या पाण्याच्या प्रचंड लोंढ्या मुळे भोटेकोशी नदीला अचानक महापूर आला. त्यामुळे रसुवा, नुवाकोट आणि धादिंग परिसरातील अनेक भागांना त्याचा मोठा फटका बसला आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत किमान आठ जणांचा मृत्यू झाला असून, अनेक नागरिक व पर्यटक बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. नेपाळ पर्यटन विभागाच्या प्राथमिक माहितीनुसार, पूरग्रस्त भागात एकूण ३८४ प्रवासी बेपत्ता किंवा संपर्कबाहेर असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामध्ये २९१ विदेशी पर्यटक आणि ९३ नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. विदेशी पर्यटकांपैकी १०५ भारतीय नागरिक असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

### <u>एम.पी.एस.सी पेपर फुटीचे प्रकरण</u>
## नंदुरबारच्या कौटिल्य ॲकेदमीचे प्रविण पाटलांसह सहा गजाआड, न्यायालयाने सुनावली पो.कोठडी

**नंदुरबार, दि.२६ (प्रतिनिधी) - एमपीएससपी परीक्षा पेपरफटीत थेट वरिष्ठ. अधिकाऱ्यांचा हात असल्याचे तपासात निष्पन्न. झाले असून अवर सचिवांसह सहा जणांना अटक करण्यात आली आहे.या सहा जणांमध्ये नंदुरबार येथील कौटिल्य ॲकेदमीच्या संचालकाचा समावेश आहे. विशेष म्हणजे पेपरफूटीत दलालची भुमिका बजावलेल्या प्रविण पाटील याने यापुर्वी आरोपांचे खंडण करीत माझ्या या प्रकरणात काहीही संबंध नसल्याचा खुलासा केला होता. परंतू मुंबई येथील पोलिस पथकाने नंदुरबारच्या संचालकालाही ताब्यात घेतले आहे. मुंबई सत्र न्यायालयाने या सर्व आरोपींना २ सप्टेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.**

अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट ब या पदाच्या चाळणी परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणात आयोगातील वरिष्ठ. अधिकाऱ्यांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे.मुंबई पोलिसांच्या विशेष पथकाने या प्रकरणी मोठी कारवाईकरीत अवर सचिवासह सहा जणांना अटक केली आहे.आरोपींना मुंबईच्या सत्र न्यायालयाने दोन सप्टेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.२२ मार्च २०२६ रोजी झालेल्या परीक्षेचा पेपर आधीच लीक झाल्याचे स्पष्ट. झाल्यानंतर आयोगाने मंगळवारी अर्थात २५ ऑगस्ट.रोजी परीक्षा रदद्र करण्याचा निर्णय घेतला होता.आता थेट आयोगाच्या अधिकाऱ्यांना अटक झाल्याने प्रशासनाला मोठा धक्का बसल्याचे सांगितले जात आहे.या प्रकरणी नंदुरबार येथील कौटिल्य केदमीचे प्रविण दिलीप पाटील, अवर सचिव अभिजीत लेंडवे, सहाय्यक कक्ष अधिकारी विश्वेश्वर नकाते,गोपाळ भटू मराठे, अमृत नामदेव पाटील व लोकेश उर्फ राजेंद्र पाटील या सहा जणांना अटक करण्यात आली आहे. सुरवातीला आयोगाने ही पेपरफुटी नाकारली होती. विनाकारण (पान ४ वर)

## देवनगर येथे सुरक्षेसाठी अंडरपास उभारा
## खा.ॲड.गोवाल पाडवींना मागणीचे निवेदन



**पिंपळनेर, दि.२६ (प्रतिनिधी)- राष्ट्रीय महामार्ग क्रमांक वरील देवनगर गावाजवळ (इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर) नागरिक,शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र बोगदा किंवा सुरक्षित क्रॉसिंगची सोय करण्यात यावी, अशी मागणी आंबापूर ग्रामपंचायत व सिद्धांत वरिष्ठ महाविद्यालय (पंढरपूर,ता.साक्री) यांच्या संयुक्त विद्यमाने नंदुरबार लोकसभा मतदारसंघाचे खासदार गोवाल पाडवी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.**

विद्यार्थी,शेतकरी व मेंढपाळांच्या जिवाला दरोरोजचा धोका असुन आंबापूर ग्रामपंचायतींतर्गत येणारे पंढरपूर (ता. साक्री,जि.धुळे) हे गाव महामार्गाच्या उत्तर बाजूस वसलेले आहे.येथील सिद्धान्त वरिष्ठ महाविद्यालयात साक्री,धुळे व नंदुरबार परिसरातील सुमारे २८८ विद्यार्थी शिक्षण घेत असुन दररोज शिक्षण, व्यवसाय व शेतीकामासाठी विद्यार्थी,शिक्षक, नागरिक आणि शेतकऱ्यांना भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमधून महामार्ग ओलांडावा लागतो. तसेच या भागातील शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय मेंढीपालन हा आहे.मेंढ्या चरण्यासाठी रस्त्याच्या पलीकडे घेऊन जावे लागते. परंतु येथे अंडरपास नसल्यामुळे मेंढ्यांना कृष्णा गार्डनजवळील उड्डाणपुलावरून किंवा खालून न्यावे लागेल, (पान ४ वर)

### दुचाकीची धडक ज्येष्ठ महिला ठार

नंदुरबार, दि.२६(प्रतिनिधी)- शहादाखेतिया रस्त्यावर भरधाव मोटारसायकलने दिलेल्या धडकेत ५८ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना ३१ जुलै २०२६ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. पोलीस नोंदीनुसार, राधाबाई मनोहर डोडवे (वय ५८, रा. वॉर्ड क्रमांक ०३, भिलट मार्ग, नवलपुरा, बडवाणी, ता. जि. बडवाणी, मध्य प्रदेश) या रस्त्याने जात असताना मोटारसायकलस्वाराने भरधाव वेगाने येऊन रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष केले. या वेळी मोटारसायकलची धडक बसल्याने राधाबाई डोडवे गंभीर जखमी झाल्या. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या अपघातास मोटारसायकलस्वाराचा निष्काळजीपणा व भरधाव वेग कारणीभूत असल्याचे पोलिसांच्या नोंदीत नमूद करण्यात आले आहे.

## दिल्लीकडे जाणारी कांदा एक्सप्रेस रोखण्याचा प्रयत्न
## लासलगावात दर्जा तपासण्याची शेतकऱ्यांची मागणी

**नाशिक, दि.२६- लासलगाव येथून दिल्लीच्या दिशेने रवाना करण्यात आलेली विशेष कांदा एक्सप्रेस आता वादाच्या भोवऱ्यात सापडली. दिल्लीला पाठवण्यात आलेल्या कांद्याच्या दर्जावरून स्थानिक शेतकरी आणि कांदा खरेदी व साठवणूक करणाऱ्या यंत्रणांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. रेल्वेतून पाठवण्यात येत असलेला कांदा सडका, खराब आणि अपेक्षित आकारापेक्षा लहान असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.**

कांदा एक्सप्रेस दिल्लीच्या दिशेने रवाना होत असताना चांदवड तालुक्यातील शेतकरी गणेश निंबाळकर यांनी स्थानिक शेतकऱ्यांसह ही रेल्वे दोन वेळा रोखण्याचा प्रयत्न केला. रेल्वेतील कांद्याच्या गोण्या उघडून प्रत्यक्ष कांद्याचा दर्जा तपासण्याची मागणी त्यांनी केली. मात्र, दुसऱ्यांदा रेल्वे रोखण्याचा प्रयत्न होताच रेल्वे पोलीस आणि स्थानिक पोलिसांनी गणेश निंबाळकर व त्यांच्या सहकाऱ्यांना बाजूला केले. त्यानंतर ही विशेष रेल्वे दिल्लीच्या दिशेने रवाना करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कांद्याच्या बोगींमध्ये गोण्या भरताना त्यामध्ये खराब दर्जाचा, सडका आणि अपेक्षित आकारापेक्षा लहान कांदा असल्याचे दिसून आले. त्यामुळे दिल्लीतील ग्राहकांसाठी नेमका कोणत्या दर्जाचा कांदा पाठवला जात आहे, असा सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. नाफेड आणि एनसीसीएफकडून कांदा खरेदी करताना गुणवत्तेसाठी ठरावीक निकष निश्चित करण्यात आल्याचे सांगितले जाते. कांद्याचा आकार, रंग, स्थिती आणि एकूण गुणवत्ता तपासून खरेदी केली जाते. साधारणतः ४५ ते ६५ मिलिमीटर आकाराच्या कांद्याला प्राधान्य दिले जाते, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मात्र, लासलगावमधून दिल्लीला पाठवण्यात आलेल्या कांद्याची प्रत्यक्ष गुणवत्ता आणि खरेदीसाठी निश्चित करण्यात आलेले निकष यामध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, (पान ४ वर)

### प्रेमविवाहाच्या कारणाने दहा जणांनी केला हल्ला

धुळे, दि.२६- नात्यातील एका तरुणाने प्रेम विवाह केल्याच्या कारणावरून धुळ्यातील एकावर आठ ते दहा जणांनी हल्ला चढविला. याप्रकरणी आझाद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.या संदर्भात नितीन चंद्रकांत थोरात (३५, रा. गल्ली क्रमांक सात, धुळे) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार त्यांच्या नात्यातील एका तरुणाने चौधरी कुटुंबातील मुलीसोबत प्रेमविवाह केला, या कारणावरून २४ ऑगस्टला रात्री दहाच्या सुमारास वानखेडे हॉस्पिटलसमोर नितीन थोरात यांच्याशी काहींनी वाद निर्माण घातला होता. त्याच रागातून बंटी गिरीश चौधरी, महेश संजय चौधरी, आशु उर्फ राहुल मारोती चौधरी, आकाश गिरीश चौधरी, गुलाब मारोती चौधरी, संजय राजाराम चौधरी, (पान २ वर)

## कच्च्या खडीच्या वापर; सोनगीर-दोंडाईचा रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

**सोनगीर, दि.२६ (प्रतिनिधी)- जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने सुरु असलेल्या सोनगीर-अंकलेश्वर या आंतरराज्य मार्गावरील सोनगीर ते दोंडाईचा या ३९ किलोमीटर टप्प्याचे विस्तारीकरण व कॉंक्रिटीकरणाचे काम सध्या वेगाने सुरू आहे. सुमारे पावणेतीनशे कोटी रुपये खर्चातून उभारल्या जाणाऱ्या या रस्त्याच्या कामात सोनगीर गावाजवळ बेड कॉंक्रिटीकरण करताना निकृष्ट व कच्च्या दगडापासून तयार केलेली खडी वापरली जात असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. त्यामुळे या रस्त्याच्या एकूण दर्जाबाबतच आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.**



सध्या या मार्गावर जुन्या मोऱ्या व पूल हटवून त्या ठिकाणी नवीन पुलांची बांधकामे केली जात आहेत. दरम्यान, सोनगीर गावाजवळ मुख्य कॉंक्रिटीकरणापूर्वी केल्या जाणाऱ्या बेड कॉंक्रीटखाली अंथरण्यात आलेली खडी अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात सत्यता पडताळण्यासाठी आमच्या प्रतिनिधीने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन (पान ४ वर)

### ना.रावल रस्त्याची पाहणी करणार

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने सुमारे पावणेतीनशे कोटी रुपये खर्चून सुरू असलेल्या सोनगीर-अंकलेश्वर या आंतरराज्य मार्गावरील सोनगीर ते दोंडाईचा (३९ किमी) रस्ता कॉंक्रिटीकरणाच्या कामात गंभीर अनियमितता समोर आली आहे. सोनगीर गावाजवळ मुख्य कॉंक्रीटपूर्वी अंथरल्या जाणाऱ्या बेड कॉंक्रिटीकरण मध्ये विहिरीतील कच्च्या व निकृष्ट दर्जाच्या डबर दगडापासून तयार केलेली खडी वापरली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे या कोट्यवधींच्या रस्त्याच्या दर्जावर आणि (पान ४ वर)



## पैगंबर जयंतीनिमित्त मुनलाईट ग्रुपतर्फे ऐंशी दात्यांनी केले रक्तदान

**धुळे, दि.२६- शहरातील मदनी चौक, मौलवीगंज येथील जशने मिलादुन्नबी (सं,अ,व,) पैगंबर जयंतीनिमित्ताने मुनलाईट सोशल ग्रुपच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी एकूण ८० जणांनी उस्फुर्तपणे रक्तदान केले.**

रक्तदान शिबिराच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते गोपाल अन्सारी हे होते.तर उद्घाटन मुस्लिफ समाज धर्मगुरू मुफ्ती महंमद कासीम जिलानी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला विशेष अतिथी उपस्थित होते आणि रक्तदान केले मा,आ. फारुक शाह, मालेगाव चे माजी आ.आसिफ शेख रशीद, जिल्हा रुग्णालयाचे सिविल सर्जन डॉ रवि सोनवणे, राजकुमार उपासे पोलीस उपअधीक्षक, आझाद नगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद पाटील, कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष भा.ई.नगराळे, रमेश श्रीखंडे,अब्दुल सलाम मास्टर, शव्वाल अमीन माजी उपमहापौर, पप्पू मुल्ला, मुजफ्फर हुसेन, भिवसन अहिरे, प्रीतम करनकाळ, मुख्तार मन्सुरी, नुरा शेख, अफसर पठाण,अमीन पटेल, सलीम भगवा,परवेस शेख, अबुलस खान, महंमद फैसल शकील अहमद, शब्बीर अमीर शाह, हाजी मंजुर, शब्बीर यसीन,अनिस अहमद खाटीक, सादीक अब्दुल रज्जाक शेख, (पान ४ वर)

## सोन्याची चैन चोरणाऱ्या मुलाच्या तपासात एल.सी.बी.ला सापडली मोटर सायकल

**धुळे, दि.२६- चैन स्नॅचींगच्या आरोपातील विधी संघर्षग्रस्त बालकाचा तपास सुरू असताना पोलिसांनी दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. संशयिताकडे दुचाकीही चोरीची असून ती सोडून तो पसार झाला. स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी गुन्हा उघडकीस आणला असून त्याचा शोध सुरू आहे.**

धुळे शहर पोलीस ठाण्यात दाखल चैन स्नॅचिंगचे गुन्हयातील पसार विधी संघर्षग्रस्त बालकाचा शोध धुळे एलसीबीच्या पोलिसांनी सुरू केला. मोहाडी येथून चाळीसगाव रोडवर विधी संघर्षग्रस्त बालक मोटर सायकल क्र.एम एच१८/बीडब्ल्यु-२९१४ घेवून जात होता. त्याने पोलीस पथक पाहताच गर्दीचा फायदा घेत मोटर सायकल सोडुन पसार झाला. मोटर सायकल सरवड (ता.धुळे) येथील अक्षय चंद्रकांत बोरसे यांचे मालकीची आहे. ११ ऑगस्ट सकाळी सातच्या पुर्वी चोरी झाली होती. याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. २५ हजार रुपये मोटर सायकलची किंमत असून ताब्यात घेण्यात आली. मोटर सायकल चोरीचा (पान २ वर)

### दभाषी जवळ अपघातात महिलेचा हात कापला

शिरपूर दि. २६ (का.प्र.)- मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर शिंदखेडा तालुक्याच्या हद्दीत दभाषी गावाजवळ उभ्या मारुती आर्टिगा कारला भरधाव कंटेनरने धडक दिल्यामुळे अपघात होऊन सहा प्रवासी गंभीर जखमी झाले. या अपघातात एका महिलेचा हात तुटून धडावेगळा झाला. सर्व जखमींना पुढील उपचारासाठी धुळे येथे हलविण्यात आले आहे.

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील दभाषी गावाजवळ तापी नदीच्या पुलावर बुधवारी (ता.२६) मध्यरात्री हा अपघात घडला. अर्टिगा कार शिरपूरहून धुळ्याच्या दिशेने जात असताना दभाषी पुलाजवळ पेट्रोल संपल्याने बंद पडली. कारमधील प्रवाशांच्या मदतीसाठी त्यांचे काही नातेवाईक दुचाकीवरून पेट्रोल घेऊन घटनास्थळी पोहोचले. मध्यरात्रीच्या अंधारात कारमध्ये पेट्रोल टाकून ती सुरू करण्याचे प्रयतक सुरू असतानाच पाठीमागून आलेल्या भरधाव ट्रेलरने कारला जोरदार धडक देऊन काही अंतर ओढत नेले. या दुर्घटनेत अब्दुल मोहम्मद हसन सत्तार (५०,रा. खरजना, इंदोर), (पान २ वर)

## मुंबईत चांगलं देण्यासाठी व सामाजिक जाणीवेतून आलो आहे
## आंतरराष्ट्रीय मैदान बनविणार-पत्रकार परिषदेत आरोपाचे खंडन

**मुंबई, दि.२६(प्रतिनिधी)- मुंबईतील तीन मैदानांची सोळा एकर जागा श्री विलेपार्ले केळवणी मंडळ (एसव्हीकेएम) ट्रस्टला देण्यात आल्याप्रकरणी विरोधकांनी केलेले आरोप बिनबुडाचे असून गैरसमजातून झाल्याचा दावा ट्रस्टचे अध्यक्ष अमरीश पटेल यांनी आज, २६ ऑगस्ट २०२६ रोजी ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत खुलासा केला. यावेळी विरोधकांकडून वारंवार मुख्यमंत्र्यांनी ट्रस्टला भूखंड मोफत देण्यात आल्याच्या आरोपांचे अमरीश पटेल यांनी खंडन केले.**

आ.अमरीशभाई पटेल



तसेच एसव्हीकेएम ट्रस्टला भूखंड मोफत देण्यात आलेले नसून ते परवाना पद्धतीने मिळालेले आहेत. त्याचबरोबर या भूखंडांच्या जागेची मालकी सरकारचीच असल्याचेही यावेळी पटेल यांनी स्पष्ट केले.

यावेळी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देताना पटेल यांनी सामाजिक बांधिलकीतून मुंबईकरांसाठी काहीतरी देणे लागत असल्याच्या भावनेतूनच क्रीडा जगतासाठी उत्कृष्ट सुविधा देण्याची प्रामाणिक इच्छा असल्याने मुंबईत मोठे क्रीडांगण व्हावे, यासाठी भूखंडाचा वापर केला जाणार असल्याचे सांगितले. तसेच भूखंड वाटपाबाबत जाणीवपूर्वक गैरसमज पसरवण्यात आल्याचे पटेल यांनी म्हटले.

यावेळी पटेल यांनी, मी जगातून गेल्यावरही मुंबईकर माझी आठवण काढतील, हीच माझी प्रामाणिक इच्छा असून याच उद्देशाने या भूखंडावर चांगले क्रीडांगण उभारण्याचा मानस आहे, असे सांगितले. तसेच हे क्रीडांगण सर्व मुंबईकरांसाठी खुले राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच याप्रसंगी अमरीशभाई पटेल यांनी मुंबईत खेळाडूंना सातत्याने सराव आणि प्रशिक्षण घेता येईल, अशा दर्जेदार क्रीडा सुविधांची गरज अधोरेखित केली.

भारत २०३६ च्या ऑलिंपिक स्पर्धांचे तसेच इतर मोठ्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. त्यासाठी केवळ पायाभूत सुविधा नव्हे, तर क्रीडा संस्कृतीही मजबूत करणे गरजेचे आहे. मुंबईतील तरुण खेळाडूंना चांगल्या सुविधा, सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि योग्य मार्गदर्शन मिळाले, तर त्यातून भविष्यातील विजेते घडू शकतात. याच उद्देशाने मुंबई उपनगरातील एक लाख तरुणांपर्यंत जागतिक दर्जाची क्रीडा परिसंस्था पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे पटेल यांनी म्हटले.

दरम्यान, एसव्हीकेएम संस्थेने आतापर्यंत एकात्मिक क्रीडा परिसंस्था विकसित करण्यासाठी १०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक केली आहे. मुंबईतील तरुणांना क्रीडा क्षेत्रात अधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या सुविधांचा विकास करण्यात येणार असल्याचे संस्थेने म्हटले आहे.

या प्रकल्पासाठी मुंबई महापालिकेने सप्टेंबर २०२५ मध्ये निविदा प्रक्रिया राबवली होती. सात संस्थांनी या प्रक्रियेत सहभाग घेतला, तर चार संस्थांचा अंतिम मूल्यांकनासाठी विचार करण्यात आला. एसव्हीकेएमने एकूण महसुलातील (पान ४ वर)

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,48,100 रु.+3% GST
सोने- 24 K -1,61,000 रु.+3% GST
चांदी- 2,50,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## शिपाईची नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून पंधरा लाखांची केली फसवणूक

**धुळे, दि.२६- दोंडाईचा (ता.शिंदखेडा) येथील एका शाळेत शिपाई पदी नोकरीचे आमिष दाखवून शहरातील एकाची १५ लाख ८८ हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी दोन संशयितांविरुद्ध सायबर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला. प्रेम राजपूत, प्रफुल्ल दिनकर भोई अशी संशयितांची नावे आहेत.**

मकसूद अन्सारी अब्दुल कुदुस (३२, रा. गल्ली क्रमांक सात, मच्छी बाजार, धुळे) यांनी तक्रारी दिली. दोनही संशयितांनी त्यांचा विश्वास संपादन केला, त्यांचा भाऊ अंजुम अन्सारी याला दोंडाईचा येथील शाळेत शिपाई पदावर नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. नोकरीची प्रक्रिया, कागदपत्रे, नियुक्ती व इतर विविध कारणे सांगून वेळोवेळी पैशांची मागणी केली.

या आमिषाला बळी पडून मकसूद अन्सारी अब्दुल कुदुस यांनी स्कॅनर, यूपीआय, आयएफएसस, एनईएफटी या ऑनलाईन माध्यमांतून दोन्ही संशयितांच्या विविध खात्यावर एकूण १५ लाख ८८ हजार रुपये वर्ग केले. पैसे देऊनही नोकरी मिळाली नाही, तपासाअंती फसवणूक झाल्याचे अन्सारी यांच्या निदर्शनास आले.अन्सारी यांनी राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टल (एनसीसीआरपी) वर ऑनलाईन तक्रार नोंदविली. त्याआधारे धुळे सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. या प्रकरणात मोबाईल क्रमांकधारक प्रेम राजपूत आणि प्रफुल्ल दिनकर भोई यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला. पोलीस तपास करीत आहेत.

### शहादा नगरपालिकेत विद्युत उपकरणे दाखल

शहादा,दि.२६ (का.प्र.)- महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा संवर्धन व तंत्रज्ञानाअंतर्गत राबवल्या जाणाऱ्या महाऊर्जा प्रकल्पातून शहादा नगर पालिकेसाठी सुमारे २३ लाख रुपयांची अत्याधुनिक विद्युत उपकरणे बसविण्यात आली आहेत.या विकासकामांतर्गत नगरपालिका मुख्य कार्यालय, नगरपालिका वाचनालय आणि नगरभवनासाठी १६५ रिमोटचलित पंखे, ५२० एलईडी दिवे व १० एसी खरेदी करण्यात आले आहेत. या सर्व उपकरणांची एकूण किंमत २३ लाख १९ हजार ३१८ रुपये असल्याची माहिती नगरपालिकेच्या विद्युत विभागाकडून प्राप्त झाली आहे. सदर खरेदी व कामाचा संपूर्ण खर्च हा (पान २ वर)

## शहाद्याच्या मुख्याधिकाऱ्यांनी पत्र देवून आंदोलन मागे घेण्याचे केले आवाहन

**शहादा,दि.२६(का.प्र.)- शहरातील रस्त्यांची दुर्दशा व दुरुस्तीच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते विशाल निकुंब यांनी शहादा व्हिजनच्या माध्यमातून दि.२७ पासून धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर शहादा नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी अधिकृत पत्र जारी करून शहरातील रस्त्यांच्या सद्यस्थितीची तांत्रिक व आर्थिक वस्तुस्थिती स्पष्ट केली आहे. तसेच, नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे सांगत आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले आहे.**

नगर विकास विभागाच्या शासननिर्णयानुसार विकासनिधीचा वापर करताना पाणीपुरवठा योजना प्रथम प्राधान्यावर आहे. शहरात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत सुमारे ६९.५७ कोटी रुपयांची वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर झाली असून सध्या विविध भागात पाईपलाईन टाकण्याचे काम वेगाने सुरू आहे. शासन नियमानुसार पाणीपुरवठा व मलनिःस्सारणाची कामे पूर्ण झाल्याशिवाय पक्क्या कॉंक्रीट किंवा डांबरी रस्त्यांची कायमस्वरूपी निर्मिती करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शहरातील मुख्य ५ रस्त्यांच्या कायमस्वरूपी बांधकामासाठी रु. १५.०४ कोटी खर्चाच्या अंदाजपत्रकास नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली आहे. हा प्रस्ताव पुढील निधी व प्रशासकीय मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्याकडे पाठवण्यात आला आहे. मंजुरी मिळताच निविदा प्रक्रिया पूर्ण करून कायमस्वरूपी रस्ते तयार केले जातील, अशी माहिती देण्यात आली.ब वर्ग दर्जा असलेल्या शहादा नगरपरिषदेचे वार्षिक उत्पन्न मर्यादित आहे. पाणीपुरवठा योजनेचा नगर परिषद हिस्सा, आगामी सार्वत्रिक निवडणूक खर्च आणि देखभाल दुरुस्तीमुळे नगरपरिषदेवर मोठा आर्थिक भार आहे. सध्या विविध विकासकामांची सुमारे १३.६३ कोटी (पान २ वर)

### कुबेर नगरातील जनतेची रस्त्याची समस्या मार्गी

शहादा, दि.२६(का.प्र.)- येथील कुबेर नगर सेक्टर क्रमांक २ व ३ मधील रहिवाशांची गेल्या तीन ते चार वर्षांपासून प्रलंबित असलेली रस्त्याची समस्या अखेर सुटली आहे. या परिसरातील खराब रस्त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.रस्त्याच्या या समस्येबाबत परिसरातील रहिवासी सचिन पाटील, उत्तम निळे, संजय अवाड, कुवर नाना आणि कांतीलाल पाटील यांच्यासह इतर नागरिकांनी उपनगराध्यक्ष माधवीताई पाटील तसेच प्रभागाचे (पान २ वर)

# आपला महाराष्ट्र

## डॉ.यास्मिन शेख:मराठीला समर्पित यहुदी विदुषी

अनेक लोक असे असतात की, ते आपल्या आयुष्यात समाजाला उपयोगी होईल असे बरेच काही करून जात असतात. मात्र त्यांच्या कर्तुत्वाची दखल फारशी घेतली जात नाही. जी घेतली जाते ती ज्या क्षेत्रात त्यांनी कामगिरी केली त्या क्षेत्रापुरती मर्यादित असते. हा एक प्रकारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर आणि त्यांच्या कर्तृत्वावर झालेला अन्यायच म्हणावा लागेल. आपल्याकडे मानसिकता अशी आहे की, बहुसंख्याक वाद आपल्या डोक्यात खोलवर रुजलेला असतो. त्या चष्म्यातूनच आपण इतिहासकार असो, साहित्यिक असो, कलावंत असो, की वैज्ञानिक असो यांच्याकडे बघत असतो. मोहम्मद रफी यांच्या सारखा पार्श्वगायक यापूर्वी कधी झाला नाही आणि होण्याची शक्यता नाही. झाले बहु होतील बहु परंतु यासम हाच असेच त्यांचे कर्तुत्व आणि ख्याती होती. मात्र त्यांचा धर्म आडवा येतो. जरी त्यांनी गायलेली गाणी दिवसभर आपण ऐकत असू, त्यांना दाद देत असू तरी मनापासून त्यांचे कौतुक होत नाही ही वस्तुस्थिती आहे. बहुसंख्यांक कलावंतांना मात्र हा समाज डोक्यावर घेतो. अलीकडच्या काही वर्षांपासून ही मानसिकता देशात रूजते आहे आणि ती देशहिताच्या दृष्टीने घातक आहे. ही सर्व पार्श्वभूमी नमूद करण्याचे कारण असे की, १०१ वर्ष वयाच्या डॉक्टर यास्मिन शेख यांचे निधन नुकतेच झाले. इंग्रजी शिकणाऱ्यांना, त्या भाषेवर प्रेम करणाऱ्यांना, आणि मराठी घरात आहे म्हणून आवडते अशी भूमिका असणाऱ्यांना डॉक्टर यास्मिन शेख माहित नाहीत. पत्रकारितेच्या आणि मराठी व्याकरणावर प्रेम करणाऱ्या मोजक्या लोकांना सोडले तर त्याही क्षेत्रातील मान्यवरांना यास्मिन शेख माहिती असतील की नाही माहिती नाही.

आताच्या पिढीला गांधी नेहरू माहिती नाहीत. माहिती करून घेण्याची त्यांची इच्छा नाही. तरीही त्या पिढीचे चौफेर कौतुक होत आहे. हा चमत्कार फक्त याच देशात घडू शकतो. पण बरेच तरुण असे आहेत की ते गांधी नेहरूंना वल्लभभाई पटेल यांना सुभाषचंद्र बोस यांना, भगतसिंग यांना, मौलाना आजाद यांना, सरहद्द गांधींना समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याबद्दल त्यांचे आभारच मानले पाहिजेत. डॉक्टर यास्मिन शेख यांच्या संदर्भात देखील असेच म्हणता येईल. काही लोकांनी त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न नक्कीच केला.अलीकडे मराठी माणूस परकीय भाषांचा वापर करून ते शब्द मराठीत रूढ करीत आहेत. त्यामुळे मराठी भाषा शुद्धीकरणाच्या दृष्टीने अडचणीत सापडली आहे. जरी साहित्य संमेलनात आणि इतर वेळी होणाऱ्या विविध चर्चासत्रात शुद्ध मराठीचा आग्रह होत असला किंवा तिच्याविषयी काळजी निर्माण होत असली तरी ती समृद्ध व्हावी यासाठी फारसे काही प्रयत्न होत नाहीत. अशा काळात डॉक्टर यास्मिन शेख यांच्यासारख्या विद्वानांची आवश्यकता भासते आणि आठवण येते. त्या दृष्टीने डॉक्टर शेख यांचे जाणे मराठी भाषेची हानी करणारे ठरते. परकीय शब्दांचा वापर करताना आपणच आपली भाषा अशुद्ध बनवतो आहोत त्याचे भान ठेवले गेले पाहिजे असा आग्रह यास्मिन शेख करीत असत. त्यांची ही भूमिका रोखठोक होती. त्या जन्माने ज्यू होत्या. त्यांचा विवाह मुस्लिम व्यक्तीशी झाला होता. परंतु त्या मराठीतील व्याकरण तज्ञ होत्या हे त्यांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. अपवादानेच अशा व्यक्ती सापडतात. त्यात यास्मिन शेख यांचा समावेश होता.

शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर त्यांनी सुमारे ३४ वर्षे अध्यापन केले. मराठीच्या प्राध्यापक म्हणून त्यांची दीर्घकाळ सेवा नोंदविली गेलेली आहे. अशा व्यक्तीने अतिशय प्रांजल पणे मराठीची सेवा केली हे विशेष म्हणावे लागेल. मराठी भाषेतील शुद्धता असेल, त्यातील सौंदर्य असेल, आणि व्याकरणीक दृष्ट्या ती प्रमाण असेल यासाठी आयुष्यभर त्यांनी व्रत म्हणून काम केलेले आहे. माझी मातृभाषा मराठी आहे आणि मला त्याचा खूप अभिमान आहे अशा त्या वेळोवेळी सांगत असत. भाषेची ताकद जर टिकवायची असेल तर त्यासाठी व्याकरणाची आवश्यकता असतेच. त्याशिवाय मराठीचे सौंदर्य खुलत नाही असे यास्मिन शेख यांनी सिद्ध करून दाखविले. त्यांचा आग्रह इतर कोणीही मोडून काढू शकले नाही कारण तो शुद्धतेचा आग्रह होता. आज खाजगी रेडिओ चॅनल किंवा खाजगी टीव्ही चे चैनल जेवढे आहेत तेवढ्यांनी मराठी भाषेचा पार खुर्दा करून ठेवलेला आहे. जनमानसात त्यामुळे तीच भाषा वापरली जाते. अनेक शब्द इंग्रजीत असतात. अनेक शब्द हिंदीतून असतात. अनेक शब्द संस्कृत मधले असतात. तसेच बोली भाषेतील शब्द देखील मोठ्या प्रमाणावर वापरले जातात त्यामुळे मराठीचे मूळ रूप हळूहळू नष्ट होत आहे. प्रमाणभाषा भलेही जनमानसात वापरली जात नसेल मात्र तिचा आग्रह साहित्यात किंवा प्रसार माध्यमातून नाकारणे चुकीचे आहे. त्या दृष्टीने यास्मिन शेख यांचे व्याकरणिक मराठीसाठी झालेले योगदान महत्त्वाचे आहे. पूर्वाश्रमीच्या त्या जेरुशा रुबेन होत्या. विवाहा नंतर यास्मिन शेख झाल्या. प्रसिद्ध नाटककार वसंत कानेटकर यांच्या पुढाकाराने त्यांचा नाशिक मध्ये एका थेटर मध्ये काम करणाऱ्या अजीज अहमद इब्राहिम शेख यांच्याशी विवाह झाला होता. साहित्यिक प्रा.श्री.म.माटे यांच्यासारख्यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. एखाद्या व्यक्तीने मराठीच्या व्याकरण या विषयासाठी आपले संपूर्ण जीवन वाहून घेणे ही फार मोठी गोष्ट आहे. भाषा हा सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक वारसा असून तो जपण्यासाठी आणि समृद्ध करण्यासाठी फारच कमी लोक झटतात त्यांच्या यादीत प्रथम क्रमांकावर यास्मिन शेख यांचे नाव घ्यावे लागेल. तेवढे मोठे त्यांचे काम आहे.

आजही व्याकरणाच्या दृष्टीने अनेकांचा मराठीत लेखन करताना खोळंबा होतो. चुकीच्या व्याकरणाचा वापर होतो. अशांसाठी मराठी लेखन मार्गदर्शिका, मराठी शब्द लेखन कोश, आणि सुगम मराठी व्याकरण कोश हे त्यांचे ग्रंथ खूपच मार्गदर्शक ठरले. या कामगिरीबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. राज्य शासनाचा मराठी भाषा विभागाचा पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, अंतर्नाद या मासिकाच्या वतीने पुरस्कार अशा काही पुरस्कारांचा त्यात समावेश आहे. त्या १०१ वर्षांच्या होऊन त्यांनी जगाचा निरोप घेतला. याचा अर्थ त्या परिपूर्ण जगल्या. मराठी शब्द लेखन हा सुमारे १९ हजार शब्दांचा संग्रह त्यांच्या लेखन संशोधनातून सिद्ध झालेला आहे. एवढे मोठे भांडार त्यांनी शुद्ध मराठीसाठी उपलब्ध करून दिलेले आहे. त्याचा वापर किती आणि कोण करणार हा जरी प्रश्न असला तरी ज्यांना शुद्ध मराठीची जाण आहे किंवा त्याच्या मनात तसा आग्रह आहे त्याच्यासाठी या १९ हजार शब्दांचा संग्रह फारच उपयोगी आहे. आपण जेवून आलो, खावून आलो, चावून घेतले, धावून आलो असे जे काही शब्द वापरतो. आणि जाऊन, खाऊन, घेऊन, लाऊन,चाऊन असेही वापरतो परंतु यातला जो मूलभूत असा फरक आहे तो आपल्या कधीच लक्षात येत नाही मात्र डॉक्टर यास्मिन शेख यांनी मराठीच्या शुद्धलेखनातून तो फरक नव्या पिढ्यांना सांगितला. त्यामुळे अनेकांच्या जीवनात मराठी भाषा शुद्ध रूपात अवतरली.अशी फार मोठी देणगी डॉक्टर शेख यांनी मराठी माणसांना दिलेली आहे. भाषेच्या वापरात अनेक संभ्रम निर्माण होतात. ते स्पष्टपणे आणि नि:शंकपणे दूर करण्याचे काम डॉक्टर शेख यांनी केलेले आहे. हे करीत असताना त्यांच्या वाट्याला समाजाकडून जी अवमानता यास्मिन मुळे किंवा जेरुसा रूबेनमुळे आली ती त्यांनी अगदी सहजपणे घेतली. हे त्यांचे मोठेपण आपल्याला मान्यच करावे लागेल. अजून किती काळ आपल्यासाठी काम करणाऱ्या गैर बहुसंख्यकांचा आपण उपमर्द करणार आहोत हा प्रश्न आहे. समाज अजून मानसिक दृष्ट्या खूप व्यापक व्हायचा आहे हेच यातून सिद्ध होते. बोली भाषेचा आदर करतानाच मराठी प्रमाण भाषाच असावी याचा आग्रह त्यांनी धरला जरूर परंतु तो दुराग्रहात रूपांतरित होऊ दिला नाही. त्यासाठी त्यांनी विवेकवाद स्वीकारला. अशा व्यक्तिमत्त्वांचा समाजाने आदर केला पाहिजे. त्यांच्या स्मृती जपल्या पाहिजेत आणि त्यांच्या कर्तबदारीला सलाम केला पाहिजे.

## संत नरहरी महाराजांची जयंती उत्साहात संपन्न

धुळे, दि.२६- सुवर्णकार समाजाचे आराध्य दैवत, संत शिरोमणी श्री नरहरी महाराजांची ८३३ वी जयंती मंगळवार, दि.२५ऑगस्ट २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.जयंतीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष चंद्रकांत सोनार, सुनील देवरे, जगदीश देवपूरकर, अजय नाशिककर, देवा सोनार, राजेंद्र जाधव, गोटू पोतदार, युवक संघटनेचे अध्यक्ष नकुल अहिरराव, जीवन सोनवणे, महिला मंडळ अध्यक्ष उषा देवपूरकर, विजय पिंगळे, भूषण सोनार, अनिल पिंगळे, गौरव पिंगळे उपस्थित होते.

## रस्त्याची समस्या मार्गी

(पान १ वरुन) नगरसेवक ललितभाई छाजेड यांची भेट घेऊन आपली अडचण मांडली होती. नागरिकांची ही अडचण लक्षात घेऊन उपनगराध्यक्ष माधवीताई पाटील यांनी तत्परतेने दखल घेतली आणि संबंधित ठिकाणी तातडीने मुरूम टाकण्यासाठी बांधकाम विभागास सूचना करण्यात येऊन रस्ता सुकर करून दिला. यामुळे कुबेर नगरातील रहिवाशांची अनेक वर्षांपासूनची मोठी अडचण दूर झाली असून परिसरात समाधानाचे वातावरण आहे.नागरिकांच्या समस्येचे तातडीने निवारण केल्याबद्दल कुबेर नगरातील सर्व रहिवाशांच्या वतीने उपनगराध्यक्ष माधवीताई पाटील व नगरसेवक ललित भाई छाजेड यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले आहेत.


**CHANGE OF NAME**

I have declared My Old Name was **RUKHASAR BANO SHAIKH HAROON** My New Name is **RUKHSAR BI ROSHAN ALI SAYYAD**
ADD- PLOT NO.484/A, CHALISGAON ROAD, BARIB NAWAZ NAGAR, NEAR NATIONAL SCHOOL, DHULE-424001

**CHANGE OF NAME**

I have declared My Old Name was **MAHERUNNISA MOHAMMAD SAYYAD** My New Name is **MAIRUNNISA BI MOHAMMAD HANIF**
ADD- PLOT NO.10, SAMARTH COLONY, SAIQA MANZIL, NATIONAL URDU HIGH SCHOOL CHALISGAON ROAD, DHULE-424001

**CHANGE OF NAME**

I have declared My Old Name was **SHAIKH FAUZIYABI SALAUDDIN** My New Name is **SAYYAD FAUZIYA MUKTADIR**
ADD- PLOT NO.10, CHALISGAON ROAD, NEAR AYESHA MASJID, SAMARTH COLONY, DHULE-424001

**CHANGE OF NAME**

I have declared My Old Name was **MOHAMMAD RAHEMAN SAYYAD** My New Name is **MOHAMMAD HANIF SAYYAD RAHEMAN**
ADD- PLOT NO.10, SAMARTH COLONY, SAIQA MANZIL, NATIONAL URDU HIGH SCHOOL CHALISGAON ROAD, DHULE-424001

**NAME CHANGE**

WE FATHER **ABID SAID SHAIKH** AND MOTHER **SHAFIQUA ABID SHAIKH** HAVE CHANGED OUR MINOR DAUGHTER NAME FROM **FATEMAH ABID SHAIKH** TO **FATIMA AABID SHAIKH** AS PER MY DOCUMENTS
**ADD- MOHAMMADI NAGAR, DEOPUR, DHULE.**


### पान १ वरुन

## एल.सी.बी.ला सापडली मोटर सायकल

गुन्हा उघडकीस आणला. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे, सहाय्यक निरीक्षक दीपक ढोके, उपनिरीक्षक अमरजित मोरे, शाम निकम, हवालदार सदेसिंग चव्हाण, शिरीष भदाणे, दिनेश परदेशी, अतुल निकम यांनी कारवाई केली.

शहरातील दसेरा मैदान- रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रोडवर चेतन राजेंद्र जाधव मोटर सायकलने जात होते. त्यांच्या गळयातील ५५ हजार रुपयांची सोन्याची चैन २७ जुनला रात्री आठच्या सुमारास वरील संशयित विधी संघर्षग्रस्त बालकाने त्याच्या अन्य साथीदारासह ओढून चोरून नेल्याचे आढळले. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, विविध पोलीस ठाण्यात अन्य गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलीस दोघा संशयीतांचा तपास करीत आहे.

## आंदोलन मागे घेण्याचे केले आवाहन

रुपयांची देयके प्रलंबित आहेत. यामध्ये रस्त्यांची तात्पुरती दुरुस्ती करणाऱ्या ठेकेदाराचे मागील वर्षाचे सुमारे ५१.३५ लाख रुपयांचे देयकही बाकी आहे.नागरिक व वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी वार्षिक कंत्राटदाराच्या माध्यमातून मुख्य रस्त्यांवरील खड्डे बुजवणे आणि तात्पुरत्या खडीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. प्रशासन या समस्येबाबत गंभीर असून उपलब्ध साधनसामग्रीच्या माध्यमातून उपाययोजना करत आहे.या सर्व तांत्रिक, शासकीय व आर्थिक बाबींचा सहानुभूतीने विचार करून विशाल निकुंब यांनी आपले प्रस्तावित धरणे आंदोलन रद्द करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी साजिद पिंजारी शहादा नगरपरिषद यांनी पत्राद्वारे केले आहे.

## अपघातात महिलेचा हात कापला

रेहान हमीद तेली (२४,खर्दे ता.शिरपूर), नदीम इस्लाम लोहार (२५, रा.शिरपूर), जावीद हसन चव्हाण (५०, रा.साक्री), यास्मिन अब्दुल तेली (४५, साक्री), हसीना सलीम पिंजारी (४५,साक्री) गंभीर जखमी झाले. यातील एका महिलेचा हात शरीरापासून तुटून वेगळा झाला. तिची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले.

अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. महामार्ग रुग्णवाहिकेद्वारे जखमींना तातडीने शिरपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर जखमींना धुळे येथील रुग्णालयात रवाना करण्यात आले.

### पान १ वरुन

## दहा जणांनी केला हल्ला

मारोती राजाराम चौधरी, हितेश चौधरी (रा. सुरत), गिरीश राजाराम चौधरी, भूषण ठाकरे (सर्व रा. धुळे) यांनी संगनमत केले. नितीन थोरात यांना अडवून शिवीगाळ करीत चाकूचा धाक दाखविला. त्यानंतर कानबाईच्या कार्यक्रमात नितीन थोरात यांच्यावर ठार मारण्याची धमकीही देत लोखंडी पाईपने हाताबुक्क्यांनी मारहाण केली. त्यात त्यांच्या नाकाला गंभीर दुखापत झाली, गळ्यातील सोन्याची साखळी, खिशातीलल एक हजार आठशे रुपयेही बळजबरीने काढून घेतले. मारहाणीत जखमी झाल्याने नितीन थोरात यांना श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले.

## ग्रुपतर्फे ऐंशी दात्यांनी केले रक्तदान

आजम शाह,जमील निजामुद्दीन,जलालुद्दीन सरदार, अबरार अन्सारी, जमीर पटेल, शेख सादीक,जाकीर ताहीर, आदी उपस्थित होते. यावेळी रक्तदान करताना धुळे धुळे शहराचे माजी आ.फारुक अन्वर शाह, आरीफ अन्सारी, एजाज अन्सारी, शेख वाहीद, दानिस शाह, अन्सारी समीर, अब्दुल रहीफ शाह, अदनान बागवान,अयान शाह,माविया अन्सारी, महंमद रफीक, महंमद फैजान, शेख हमजा, महंमद सलाम,जमील शेख,सगीर शाह,अयमैन अन्सारी,वसीफ अन्सारी,सुरैम अन्सारी, महमद मुस्तुफा शेख,रेहान पिंजारी,सलीफ सईद अन्सारी, महंफ्द अरशलन,सुबैय्याल अन्सारी, शब्बीर खान,अबुजर अन्सारी, अन्सारी शोएब, महंमद अन्सारी, महंमद साजीद,तौसीफ अन्सारी, अन्सारी नईम,जहुर अहमद, अब्दुल रशीद, शेख इरफान, महंमद सलीम, महंमद कैफ, आसिफ अन्सारी, महंमद शफीक, शाहरुख शेख, रिजवान अहमद, अन्सारी नईम, जफर जब्बार शाह, मोहम्मद साद, अन्सारी अबू ताला अन्सारी यामीन मुबारक , अन्सारी ओसामा, मोहम्मद जैद,जाविद देशमुख,अकरम अकबर,माज़ खाटीक, शेख हुजैफा,रईस खाटीक, अब्दुल रशीद,मुजाहिद शाह,परवेज अख्तर,अबु सुफीयान, महंमद मोआज मुजफ्फर हुसेन,फहीफ अख्तर,नईफ अन्सारी, आदीनी रक्तदान केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मतीन अन्वर, निहाल अखतार यांनी केले, तर कार्यक्रमाचे आयोजक महंमद मआज मुजफ्फर हुसेन यांनी यशस्वीपणे आयोजन केले.

## विद्युत उपकरणे दाखल

शासनाच्या निधीतून केला जाणार आहे.या योजनेअंतर्गत १.३ ते १.६ टनाचे ५ एसी आणि १.६ ते २ टनाचे ५ एसी असे एकूण १० एसी मुख्याधिकारी कार्यालय, नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष केबिन, तसेच नगर भवन आणि वाचनालयात बसविण्यात येणार आहेत. हे काम शासकीय ठेकेदारामार्फत केले जात असल्याची माहिती विद्युत विभागाचे अभियंता योगेश वाडीले यांनी दिली आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस, बॅकांचा, हितसंबधितांना सदर जाहीर नोटीसने कळविण्यात येते. की, मिळकत मौजे मोहाडी प्र.ल. येथील गट नं.६८/४ पैकी प्लॉट नं.८, चे एकूण क्षेत्र ९० चौ.मी. अशी बांधीव मिळकत त्यात तीन रूम, संडास बाथरूम, विज कनेक्शन बोअरींग मिटरसह त्याची चतुसिमा नकाशा रेकॉर्ड प्रमाणे.

येणेप्रमाणे वर नमूद मिळकत मालक रुक्साना मुनाफ खाटिक, रा.नाम का मल्ला, धुळे. याचे मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत असून सदर मिळकत ही आमचे पक्षकार शहेजाद अ.मुनाफ मुल्ला, रा.धुळे, यांनी कायम खरेदीचा सौदा केला असून बयाणापोटी रक्कम दिलेली आहे. सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार आमचे पक्षकार हे संबंधीत व्यक्तीशी पूर्ण करणार आहेत.

तरी सर्वाना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, साबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपटटा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच, वारस हक्क, खावटी दृ म जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे (०७) सात दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्राची प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर असल्यास त्या ग्राहय धरण्यात येणार नाही व हरकती न असल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणून खरेदी करतील. नंतर आलेल्या हरकती हया ग्राहय धरल्या जाणार नाही. सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे, दिनांक:- २६/०८/२०२६.

**ॲड.परवेज निसार तांबोळी**
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे.
**मो.नं.७०२०३८१३९४**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सहकारी, निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतींचे वर्णन:-** मौजे अजंग ता.जि.धुळे येथील ग.नं.४१६/१ यासी क्षेत्र २ हे ७७ आर पैकी २ हे ०० आर यामी चतु:सिमा गांवनकाशाप्रमाणं चे मालक श्री.पितांबर रामदास भिल यांचे ताबे उपभोगातील व मालकी हक्कातील असून त्यांचंशी आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी खत करणेकामी बोलणी केली असून सौद्यापोटीची बयाणा रक्कम दिलेली असून तसा कायमस्वरुपी विक्रीचा सौदाही केलेला आहे. व लवकरच खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

उपरोक्त मिळकत संदर्भात कुणाचा मालकी हक्क, सौदा करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुल, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी खालील पत्यावर त्यांच्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत ॲड.दिनेश वसंतराव गायकवाड रा.प्लॉट नं.२०, समर्थ नगर, उत्कर्ष कॉलनी जवळ, साकी रोड, धुळे मो.नं.९८६०९८२७०४ यांचे कडे नोंदवाव्यात. सदर मुदती नंतर उपरोक्त मिळकतीच्या संदर्भात आलेल्या हरकती, तसेच लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती, तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, ग्राहय धरण्यात येणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदरची जाहिर नोटीस आमच्या आशिलाचे सांगण्यावरून व माहिती वरून आमचं मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट
धुळे, दिनांक:- २५/०८/२०२६.

**ॲड.दिनेश वसंतराव गायकवाड**
२०, समर्थ नगर, साक्री रोड, धुळे.
**मो.नं.९८६०९८२७०४**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे नरडाणा ता.जि.धुळे येथील भुमापन क्रं. व उपविभा २४२ पैकी प्लॉट नं.१ चे एकूण क्षेत्र २२० चौ.मी.चा आकार २२ रु.०० पैसे चा बखळ प्लॉट अशी मिळकत

| यासी | चतु:सिमा |
|---|---|
| पूर्वेस- | रस्ता, |
| पश्चिमेस- | प्लॉट नं.३, |
| दक्षिणेस- | प्लॉट नं.२, |
| उत्तरेस- | गट नं.२४१ |

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील मिळकत ही १) अजय पिरन पाटील २) लिना राहुल पाटील ३) हिराबाई पिरन पाटील ४) गिरीष पिरन सिसोदे सर्व रा.नरडाणा ता.शिंदखेडा जि.धुळे यांच्या संयुक्त मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांचे ज.मु.म्हणून अजय पिरन पाटील यांच्या कडून सदर मिळकत ही आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करून खात्री करून द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध व वरील नमूद मालकांच्या संयुक्त मालकीची असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट
धुळे, दिनांक:- २६/०८/२०२६.

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींगजवळ, मिलपरीसर, धुळे.
**मो.नं.९४२२७७१२७४**

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सहकारी, निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** मौजे महिंदळे ता.जि.धुळे येथील म.न.पा. हद्दीतील कुमार नगर भागातील सि.स.नं.६७२४ (एकूण क्षेत्र १६३.५ चौ.मी.) मधील ''हरीहर रेसिडेन्शियल अ‍ॅन्ड कमर्शियल कॉम्प्लेक्स'' या इमारतीमधील ग्राउंड फ्लोअर वरील आर.सी.सी. बांधीव गाळा नं. जीएफएस शॉप नं.२ (क्षेत्र ८ चौ.मी. म्हणजेच ८६ चौ. फुट बिल्टअप एरिया) यासी छठः सीमा- पूर्वेस : याच मिळकतीपैकी उर्वरित भाग, पश्चिमेस : रस्ता, दक्षिणेस : जीएफएस शॉप नं.३, उत्तरेस : जीएफएस शॉप नं.१, वर : फ्लॅट, खाली : तळ. येणेप्रमाणे छठःसीमेच्या आतील मिळकतीचे मालक श्री.विलास बन्सीलाल कांबळे (रा.सुरभि कॉलनी, साक्री रोड, धुळे) यांचे ताबे उपभोगातील व मालकी हक्कातील असून, त्यांचेशी आमचे अशिल यांनी कायम स्वरूपी खरेदी खत करणेकामी बोलणी केली असून सौद्यापोटीची बयाणा रक्कम दिलेली असून तसा कायमस्वरूपी विक्रीचा सौदाही केलेला आहे. व लवकरच खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.


उपरोक्त मिळकत संदर्भात कुणाचा मालकी हक्क, सौदा करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अ‍ॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजा, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुळ, खरेदी-विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी खालील पत्त्यावर त्यांच्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत ॲड.संयम सचिन कापडिया, १४६६, फ्रेंडशिप ट्रॅव्हल्स, झाशी राणी चौक, रेड क्रॉस रोड, धुळे-४२४००१ यांचे कडे नोंदवाव्यात. सदर मुदती नंतर उपरोक्त मिळकतीच्या संदर्भात आलेल्या हरकती, तसेच लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती, तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

सदरची जाहीर नोटीस आमच्या अशिलांचे सांगण्यावरून व माहिती वरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दिनांक:- २६/०८/२०२६.
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.संजय सचिन कापडिया**
**मो.नं.९८३४६७६५८०**


### शब्दकोडे क्रमांक : २४४०



**आडवे शब्द :** १.प्रोत्साहन किंवा मनात निर्माण होणारी काम करण्याची स्फूर्ती ३. खिडकीला किंवा आरशामध्ये वापरला जाणारा पारदर्शक पदार्थ ४.सन्मानपूर्वक केलेला नमस्कार किंवा वंदन ९.अत्यंत आवडती, लाडकी किंवा जिच्यावर प्रेम आहे अशी स्त्री १०. वजनाने कमी असलेला ११.आठवड्याचा एखादा विशिष्ट दिवस किंवा शत्रूवर केलेला आघात १२.संगीत, अभिनय किंवा चित्रकलेमध्ये निपुण असणारी व्यक्ती १४. तूप १५.वसा चालवणारा १७.स्वतःच्या धुंदीत किंवा गर्वाने चूर असलेला १९.धनुष्यातून सोडला जाणारा बाण २०.दाणेदार सांजा २३.वन्य प्राण्यांमधील रानडुक्कर किंवा विष्णूचा एक प्रसिद्ध अवतार २४.एखाद्या ठिकाणी येणे किंवा प्रवेश करणे २६. बारा वर्षाचा काळ २८. हॉटेल किंवा ढाब्यावर मिळणारा मैद्याचा एक प्रसिद्ध जाड रोटीचा प्रकार २९.सुट्टी ३१.मराठी स्वरचिन्हांसह अक्षरांची क्रमाने केलेली मांडणी ३४. '** पाव' एक प्रसिद्ध खाद्यपदार्थ ३५.गळ्यात घालण्याची फुलांची माळ ३६.नौका ३७. झाडांनी वेढलेले हिरवेगार जंगल किंवा दाट झाडी ४१.घेतलेला नियम, व्रत किंवा एखादी परंपरा पुढे चालू ठेवणे ४२.गणिती प्रक्रियेतील वजाबाकी किंवा कमी करणे ४३.ग्रामीण भागात लाकडावर स्वयंपाक करण्यासाठी वापरले जाणारे मातीचे साधन ४६. पोलिसांकडून गुन्ह्याचा लावला जाणारा शोध किंवा चौकशी ४८.आकाराने अतिशय लहान किंवा सूक्ष्म ४९.शरीरातील रक्त वाहून नेणारी नस किंवा डोके/मस्तक ५०.लिंबाच्या प्रजातीमधील एक मोठे आणि चवीला आंबट असलेले फळ ५२.मुखातून शब्द न काढणारा, शांत किंवा मुका ५३.हिरव्या रंगाचे दाणे असणारी हिवाळ्यातील एक लोकप्रिय भाजी ५४. सरळ नसलेला भाग किंवा आलेले वळण ५५.गाड्यांना गती देणारे गोल फिरणारे साधन ५६.झाडाचा मुख्य मजबूत बुंधा किंवा एखादी वाईट सवय **उभे शब्द :** १.एखाद्याला स्फूर्ती किंवा प्रोत्साहन देणारा घटक वा व्यक्ती २.मध्य प्रदेश राज्यातील शेवेसाठी प्रसिद्ध असलेले एक शहर ३.मानवी शरीर ४.हळूच ५.दारात येऊन अन्न किंवा पैसे मागणारा याचक ६. औषध ७. मुलायम ९.प्रियकर १३.आदराने वाकून केलेला नमस्कार किंवा प्रणाम १६.सप्त सुरांची धून १८.ईश्वराचे केलेले गुणगाण १९.नगर २१.चुकीचा मार्ग २२.समाजात असणारी मोठी प्रतिष्ठा २५.मानवी दृष्टी २७.पीठ पाळण्याचे साधन २८.नस ३०.मुलीचा पती ३२.दुधापासून बनवला जाणारा एक पदार्थ ३३.दैत्य ३५.हस्त ३८.गोविंदा,करिष्मा कपूर यांचा एक सिनेमा ३९.जाळे-हिंदीत ४०.पुस्तकाची कॉपी किंवा एखाद्या वस्तूचा दर्जा ४३.गर्दीत झालेली तातातूट ४४.दैना ४६.एक शेंगभाजी ४७.दिवाळीत सुरु होणारे व्यापारी नवीन वर्ष ५१.वेबसाईटचा पत्ता सांगणारी सांकेतिक भाषा

### शब्दकोडे क्रमांक : २४३९ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| यो | गा | स | न | | सा | र | | प | री | वा | र |
| | य | म | | त | ज | वी | ज | | ता | प | |
| के | | र | ता | ळे | | ना | | वि | | र | जा |
| क | स | | ट | | पा | | वि | ष | म | | ल |
| | र | सा | | सा | ग | र | | य | | वि | |
| बों | ब | | ध | व | ल | | स | | त | हा | न |
| | त | क | | ली | | कै | क | यी | | र | |
| क | | स्तु | त्य | | गु | ला | ल | | क | | वा |
| शि | वा | र | | सु | वा | स | | स | रा | स | री |
| दा | | बा | द | श | हा | | स | ह | म | ती | |
| | पी | | र | | टी | च | र | | ती | | ना |
| की | | क | ड | वा | | र | स | ना | | चो | री |







## संत नरहरी महाराजांची जयंती उत्साहात संपन्न

धुळे, दि.२५- सुवर्णकार समाजाचे आराध्य दैवत, संत शिरोमणी श्री नरहरी महाराजांची ८३३ वी जयंती मंगळवार, दि.२५ऑगस्ट २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली.

जयंतीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष चंद्रकांत सोनार, सुनील देवरे, जगदीश देवपूरकर, अजय नाशिककर, देवा सोनार, राजेंद्र जाधव, गोटू पोतदार, युवक संघटनेचे अध्यक्ष नकुल अहिरराव, जीवन सोनवणे, महिला मंडळ अध्यक्ष उषा देवपूरकर, विजय पिंगळे, भूषण सोनार, अनिल पिंगळे, गौरव पिंगळे, अनिल देवपूरकर, श्याम सोनार, रमेश पोद्दार, दीपक वारकर, संदीप गोरनेकर, महेंद्र विसपुते, मनोज वाघ, रवींद्र विभांडिक, अंकुर सोनार यांच्यासह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

### प्रकाश में आज आफत




नविन निश्चल लिना चंदावरकर, महेमूद अहमजद खान प्रेमा नारायण टुनटुन कमल कपूर

## पान १ वरुन

### विकसित भारतचे स्वप्न अशक्य

प्रवाहांवर आणि आव्हानांवर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन शहा यांनी केले. भविष्यात निर्माण होणारी आव्हाने मोठ्या संकटाचे स्वरूप धारण करण्यापूर्वीच त्यांची ओळख पटवून त्यांना निष्प्रभ करण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा रणनीती परिषदेने प्रभावी नियोजन करावे, असेही ते म्हणाले.

**कायद्यांची पूर्ण अंमलबजावणी**

पुढील एका वर्षाच्या आत देशातील तीन नवीन गुन्हेगारी कायदे पूर्णपणे लागू करण्याचे सरकारचे उद्दिष्ट असल्याचे शहा यांनी सांगितले. या कायद्यांमुळे न्यायप्रक्रिया अधिक गतिमान करण्यावर भर देण्यात आला असून, गुन्हेगारी खटले सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरापर्यंत तीन वर्षांच्या आत निकाली निघू शकतील, अशा प्रकारे व्यवस्थेची रचना करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या सुधारणांमुळे शिक्षेच्या प्रमाणातही पंचवीस टक्क्यांनी वाढ होण्याची अपेक्षा असल्याचे शहा यांनी नमूद केले. मजबूत सुरक्षा व्यवस्था, आधुनिक गुप्तचर यंत्रणा आणि प्रभावी न्यायप्रणाली यांच्या माध्यमातून विकसित भारताच्या संकल्पनेला बळकटी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### प्रविण पाटलांसह सहा गजाआड

आयोगाची बदनामी करणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही देण्यात आला होता.वाढता दबाव पाहता मुंबई पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण विभागाकडे तपास सोपविण्यात आला होता.

नंदुरबारचा प्रविण पाटील याने विविध सामाजिक संघटनेत सहभागी होत आपली प्रतिमा स्वच्छ. केली होती.काही दिवसांपुर्वी नंदुरबारच्या एका बडया पोलिस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एक प्रबोधनपर कार्यक्रम घेतला होता.यात निमशासकीय अधिकाऱ्यांनीही हजेरी लावली होती.

पेपर फुटीत नंदुरबारच्या कोटिल्य़ केदमीचे संचालक प्रविण पाटील यांचे नाव पेपर फूटीत सर्व प्रथम आले.विशेष म्हणजे आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परीषद घेवून हा मुदद्दा उपस्थित केला होता.सुषमा अंधारे यांनीही हे प्रकरण लावून धरले. काही विद्यार्थ्यांनी इमेल व्दारे तक्रारी केल्या होत्या.

### सुरक्षेसाठी अंडरपास उभारा

ज्यामुळे मेंढ्यांचा अपघात होण्याचा आणि महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.यापूर्वी याच ठिकाणी अपघातात एका प्रौढ महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, सततच्या अपघातांमुळे परिसरात प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे.हॉटेल कृष्णा गार्डनजवळ प्रस्तावित असलेला सबवे हा गाव व महाविद्यालयापासून दूर आहे.तेथे पोहोचण्यासाठी उड्डाणपुलाच्या खालून अत्यंत धोकादायक पद्धतीने महामार्ग क्रॉस करावा लागतो.त्यामुळे ही व्यवस्था पूर्णपणे अपुरी गैरसोयीची आणि सुरक्षेच्या दृष्टीने अयोग्य असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये ऋदेवनगर गावाजवळ, इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर नॅशनल हायवेवर स्वतंत्र बोगदा किंवा सुरक्षित क्रॉसिंग त्वरित मंजूर करण्यात यावे. मेंढपाळ,शेतकरी, ऋनागरिक व विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या समस्येची तातडीने दखल घ्यावी. हे संयुक्त निवेदन आंबापूर ग्रामपंचायतीच्या प्रशासक श्रीम. सरला नाना बोरकर, आणि सिद्धांत वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आले. खासदार अँड.गोवाल पाडवी यांनी तात्काळ लक्ष घालून महामार्ग प्राधिकरणाकडे पाठपुरावा करावा, अशी आग्रही मागणी ग्रामस्थ,पालक, विद्यार्थ्यांकडून करण्यात आली.

निवेदन देतांना काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष भानुदास गांगुर्डे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष प्रवीण चौरे,माजी सरपंच साहेबराव बोरकर,अंबापुरचे पोलीस पाटील शरद मारनर,शांताराम कुवर,माजी सभापती विश्वास बागुल,माजी जि प सदस्य कमलाकर साबळे,किसन वळवी,महारू मारनर,माजी पं.स.सदस्य लोटन मारनर,भिला कारंडे,नारायण कारंडे,राजू मारनर, अंबापुर पंढरपूर देवनगर येथील ग्रामस्थ व सिद्धांत वरिष्ठ महाविद्यालयाचे संचालक इंजि. प्रवीण सोनवणे उपस्थित होते.

### कांदा एक्सप्रेस रोखण्याचा प्रयत्न

शेतकऱ्यांचे हे आरोप सीडब्ल्यूसीच्या अधिकाऱ्यांनी फेटाळून लावले आहेत. सीडब्ल्यूसीचे अधिकारी अजय जादू यांनी दिल्लीला पाठवण्यात येणारा कांदा योग्य दर्जाचा असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा आरोप खरा की अधिकाऱ्यांचा दावा, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कांदा एक्सप्रेसमधील आणखी एक बाब चर्चेचा विषय ठरली आहे. तब्बल एकवीस बोगींची विशेष रेल्वे असताना त्यातून केवळ साडेचारशे मेट्रीक टन कांदा दिल्लीला रवाना करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. रेल्वेची मोठी क्षमता उपलब्ध असतानाही अनेक बोगींमध्ये अपेक्षेइतका माल भरला गेला नसल्याचे चित्र असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. उपलब्ध क्षमतेच्या तुलनेत जवळपास साठ ते पासष्ट टक्के जागा रिकामी राहिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. लासलगाव रेल्वे प्रशासनाने ही कांदा एक्सप्रेस पुढील चोवीस तासांत दिल्लीतील आदर्श नगर रेल्वे स्थानकापर्यंत पोहोचवण्याचे नियोजन केले आहे. मात्र, दिल्लीला पाठवण्यात येणाऱ्या कांद्याच्या दर्जावरून निर्माण झालेला वाद अधिक गंभीर बनत चालला आहे.

येत्या काळात नाशिकचा कांदा दिल्लीसह देशातील विविध राज्यांमध्ये रेल्वे आणि ट्रकच्या माध्यमातून पाठवण्यात येणार आहे. त्यामुळे लासलगावमधून रवाना झालेल्या या कांद्याच्या दर्जाबाबत सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. दिल्लीला पाठवण्यात आलेला कांदा गुणवत्ता निकषांमध्ये बसत नसेल तर त्याची खरेदी नेमकी कोणत्या निकषांवर करण्यात आली? त्याची साठवणूक कशी करण्यात आली? आणि ग्राहकांपर्यंत कोणत्या दर्जाचा कांदा पोहोचत आहे? असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केले आहेत. कांद्याच्या मुद्द्यावरून सुरू झालेला हा वाद आता केवळ गुणवत्तेपुरता मर्यादित राहिलेला नसून, नाफेड, एनसीसीएफ, सीडब्ल्यूसी आणि सरकारच्या कांदा खरेदी व वितरण व्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शेतकऱ्यांच्या आरोपांची चौकशी होणार का आणि दिल्लीला रवाना झालेल्या कांद्याचा प्रत्यक्ष दर्जा काय आहे, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कच्च्या खडीच्या वापर

पाहणी केली असता, बेड काँक्रीटखाली सुमारे पाऊण ते एक फूट उंचीचा खडीचा थर अंथरण्यात आल्याचे दिसले. ही खडी एखाद्या विहिरीतील कच्च्या डबर दगडापासून तयार करण्यात आल्याची तीव्र शंका व्यक्त केली जात आहे.

अशा प्रकारे निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर करून तयार करण्यात आलेला हा कोट्यवधी रुपयांचा रस्ता भविष्यात किती काळ टिकेल, याबाबत प्रवाशांमधून व स्थानिकांमधून शंका उपस्थित केली जात आहे. या संपूर्ण कामावर सार्वजनिक बांधकाम उपविभाग (शिंदखेडा) यांचे नियंत्रण व पर्यवेक्षण असून, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीची तत्काळ दखल घेऊन चौकशी करावी आणि दर्जाहीन काम थांबवावे, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

### आ.रावल रस्त्याची पाहणी करणार

टिकाऊपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दरम्यान , धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. जयकुमार रावल गुरुवारी (दि. २७) शिंदखेडा तालुक्यातील विविध विकासकामांच्या दौऱ्यावर असताना दुपारी ३ वाजता चिमठाणे ते सोनगीर रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत.स्थानिक नागरिक व प्रवाशांमधून सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या (शिंदखेडा) निष्काळजीपणाबद्दल संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रत्यक्ष पाहणीदरम्यान पालकमंत्री या दर्जाहीन आणि निकृष्ट कामाची दखल घेऊन संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर काय कारवाई करतात, तसेच कामाची तात्काळ चौकशी करून गुणवत्ता सुधारण्याचे काय आदेश देतात, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागून राहिले आहे.

## निधन वार्ता

### संजय गजरे



धुळे, दि.२६- चितोड रोड परिसरातील रमेश नगरातील रहिवासी संजय भानुदास गजरे दोधवदकर यांचे दि.२६ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजता अल्पश: आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६२ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा आज दि.२७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता राहत्या घरापासून काढण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी दोन भाऊ असा परिवार आहे. ते योगेश गजरे व जितेंद्र गजरे यांचे बंधू होत.

### बन्सीलाल पाटील



म्हसावद,दि.२६ - शहादा तालुक्यातील म्हसावद येथील रहिवासी बन्सीलाल सजन पाटील यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. ते सती गोदावरी माता विद्यालयाचे शिक्षक अंबालाल पाटील यांचे वडील होत.

### विजया पाटील

म्हसावद,दि.२६- शहादा तालुक्यातील म्हसावद येथील रहिवासी विजयाबाई सुदाम पाटील यांचे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७१ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. त्या सुदाम वेडू पाटील यांच्या पत्नी तर वासुदेव पाटील यांच्या मातोश्री होत.

(पान १ वरुन) ५० टक्के हिस्सा देण्याची सर्वाधिक बोली सादर केली असल्याचे संस्थेने म्हटले आहे.

एसव्हीकेएम संस्थेचा उद्देश

मुंबईत क्रीडा सुविधांना नवी दिशा देण्याचा संस्थेचा उद्देश असून, मुंबईतील क्रीडा पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी श्री विलेपार्ले केळवणी मंडळ (एसव्हीकेएम) शहरातील तीन ठिकाणी क्रीडा सुविधांचा विकास आणि व्यवस्थापन करणार आहे.

अंधेरीतील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, विलेपार्ले तील लोकमान्य टिळक गार्डन आणि अंधेरीतील डी. एन. नगर येथील सिमेंट गोडाऊन या तीन ठिकाणांचा त्यात समावेश असून, या जागांचे एकूण क्षेत्रफळ १६ एकर नसून १४.११ एकर आहे.

या तिन्ही जागांची मालकी मुंबई महापालिका आणि महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे (म्हाडा) कायम राहणार आहे. एसव्हीकेएमला म्हाडाच्या जागा वर्षांसाठी, तर मुंबई महापालिकेचे क्रीडा संकुल १० वर्षांसाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) पद्धतीने मर्यादित कालावधीसाठी देण्यात आले आहे.

## मुंबईत चांगलं देण्यासाठी व सामाजिक जाणीवेतून आलो आहे

त्यामुळे जागांचे कायमस्वरूपी हस्तांतरण संस्थेकडे झालेले नसून, मालकी मुंबई महापालिका आणि म्हाडाकडेच राहणार असल्याचे एसव्हीकेएमने स्पष्ट केले आहे.

या प्रकल्पांतर्गत स्थानिक नागरिक, मुले आणि युवा खेळाडूंना अधिक चांगल्या क्रीडा सुविधा आणि व्यावसायिक प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. भारतीय खेळ खो-खो, कबड्डी, क्रिकेट, फुटबॉल, अॅथलेटिक्स, टेनिस, बास्केटबॉल, पिकलबॉल, तसेच इनडोअर जिम्नॅशियम आणि इनडोअर खेळांच्या सुविधांचा विकास करण्यात येणार आहे.

या प्रकल्पासाठी लागणारा भांडवली खर्च, संचालन आणि सुविधांच्या विकासासाठीचा सर्व देखभाल खर्च एसव्हीकेएम करणार आहे. अंधेरीतील क्रीडा संकुलासाठी अतिरिक्त ४० ते ५० प्रमाणित प्रशिक्षक, क्रीडा अधिकारी, समन्वयक आणि शारीरिक शिक्षण शिक्षक नियुक्त करण्याचे प्रस्तावित आहे. एसव्हीकेएमच्या म्हणण्यानुसार, संस्थेच्या क्रीडा उपक्रमांमध्ये सध्या १४८ हून अधिक क्रीडा प्रशिक्षक कार्यरत आहेत.

दरम्यान, या तीन जागांचे एकत्रित क्षेत्रफळ १६ एकर नसून १४.११ एकर असल्याचेही एसव्हीकेएमने स्पष्ट केले आहे. अंधेरीतील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलाचे क्षेत्रफळ ११.५७ एकर, विलेपार्लेतील लोकमान्य टिळक गार्डनचे ०.९२ एकर आणि डी. एन. नगरमधील जागेचे १.६२ एकर आहे.

एसव्हीकेएमची खेळाबद्दलची दूरदृष्टी आणि कटिबद्धता

२०३६ मध्ये भारत ऑलिंपिक स्पर्धांचे आयोजन करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. ऑलिंपिक स्पर्धा भारतात होणार असतील, तर त्यासाठी सक्षम क्रीडा पायाभूत सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्वोत्तम आणि जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा तयार होणे आवश्यक आहे. मुंबईतील खेळाडूंना सर्वोत्तम क्रीडा सुविधा आणि प्रशिक्षण मिळावे, यासाठी एसव्हीकेएम ही तयारी करत आहे.


WE ARE HIRING

स्टोर मैनेजर



बैंटरी, सोलर व पावर प्रोंडक्ट्सच्या प्रतिष्ठित शोरूमसाठी अनुभवी स्टोर मैंनेजरची आवश्यकता आहे.

अनुभव : किमान 5 वर्ष (सेल्समध्ये) - देवपूर परिसरासाठी

- सेल्स व कस्टमर हँडलिंगचा चांगला अनुभव
- स्टॉक मँनेजमेंट व दैनिक कामकाज सांभाळण्याची क्षमता

: Walk-in Interview :
27th August 2026, Time- 10 a.m. TO 2.00 p.m.

TATA POWER SOLAR SOLAR ROOFTOP SOLUTIONS | EXIDE BATTERIES | POWERICA A PROMISE FOR POWER | POWERICA CUMMINS DIESEL GENERATORS

SUPERB™ BATTERIES
Malegaon Road, Opposite Volkswagen Showroom, Dhule.

|| ६ वे पुण्यस्मरण ||



आपली जीवन ज्योत मालवली,
पण आमच्या ओंजळीत..
आपल्या आठवणींच्या असंख्य ज्योती
सदैव तेवत राहणार आहेत...
आपल्या चरणी आमची
भावपूर्ण श्रध्दांजली!
कै. सुधाकर मुकुंद सोनार
जन्म दि. ०१/०६/१९५१ मृत्यु दि. २७/०८/२०२०
••श्रध्दावनत••
चेअरमन, संचालक मंडळ
सुमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., देवपूर, धुळे
पत्ता २ दिनेश शॉपींग कॉम्प्लेक्स, नेहरू चौक, आग्रा रोड, देवपूर, धुळे

**विकणे आहे**

१) देवपूर आग्रारोड, हिम हॉटेलचेमागे, हॉस्पिटल किंवा अपार्टमेंट बनविणेसाठी उपयुक्त असा सिटीएस क्र.४९७५ क्षेत्रफळ ५४७५ चौरस फुटाचा प्लॉट.
२) गोंदुर विमानतळ रोड टच मौजे गोंदुर, गट नं.५५/३बी प्लॉट नं.१ क्षेत्रफळ ६७४० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9420602255/9422285483

**पाहिजेत**

१) अनुभवी सेल्समन पाहिजे पगार अनुभवाप्रमाणे देण्यात येईल.
२) लेडिज टॅली अकाऊन्टंट पाहिजे.
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
अकबर चौक, गल्ली नं.२, धुळे
9422286958


**पाहिजेत**

१) बेकरीफॅक्टरीमध्येमेंटेनन्स आणि सुपरव्हिजनसाठी ITI Technician ची गरज आहे.
२) बेकरीच्या मालाच्या वाटपसाठी Salesman माणूस पाहिजे. लिहिता, वाचता आणि हिसोब करता येणे आवश्यक
-: संपर्क :-
लाइफ लाईन बेकरी
मालेगाव रोड, धुळे
7507699616


|| धनदाई माता प्रसन्न || || श्री गणेशाय नमः || || जय जय रघुवीर समर्थ ||
कार्य सिद्धी नेण्यास श्री सद्गुरू समर्थ आहेतच



कै.भगवान सुंदर चौधरी



माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी



कै.श्रीमती लक्ष्मीबाई भगवानशेठ चौधरी

माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी नगर
सस्नेह निमंत्रण
नामकरण सोहळा
•नामकरण सोहळ्याचे अध्यक्ष•
श्री.बाबासाहेब राजवर्धन कदमबांडे,माजी आमदार,धुळे शहर
•प्रमुख पाहुणे•
श्री.अमोल पाटणकर
उपसचिव मुख्यमंत्री कार्यालय,मंत्रालय,मुंबई
•नामकरण हस्ते•
श्री.मदनलालजी मिश्रा सर
अध्यक्ष लोकतंत्र सेनानी संघ धुळे
माजी आमदार स्व.डॉ.रा.भ. चौधरी नगरातील नियोजित विविध प्रकल्प
प्लॉट बुकिंग हफ्त्याने सुरु आहे
चौधरी वेअर हाऊस प्लॉटस — नामकरण हस्ते मा.श्री. विनोदशेठ मित्तल, सुप्रसिद्ध उद्योगपती, धुळे
रघुवीर समर्थ कोल्ड स्टोरेज हाऊस — नामकरण हस्ते मा.श्री. ओमप्रकाशजी अग्रवाल, ज्येष्ठ राजकीय व सामाजिक नेते, धुळे
अलकनंदा लॉन्स — नामकरण हस्ते मा.श्री. सुभाषजी चोथमल अक्षवाल, सुप्रसिद्ध उद्योजक, धुळे
आलेल्या सर्व मान्यवरांचे हार्दिक स्वागत !
मातोश्री लक्ष्मी मंगल कार्यालय — नामकरण हस्ते : श्री. जगन्नाथ सुपडू चौधरी, शिरपूर तेली समाजाचे माजी अध्यक्ष
मातोश्री सरस्वती मंगल कार्यालय — नामकरण हस्ते मा.श्री. प्रकाश घवघवे (नागपूर), गिनीजबुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद असलेलेले ज्येष्ठ संशोधक
विनीत : श्री.रघुनाथ भगवान चौधरी * सौ.अलका रघुनाथ चौधरी * श्री.डॉ.नरेंद्र वामनराव राऊत (पुणे) * सौ. डॉ.संगिता नरेंद्र राऊत
श्री.मनोज रघुनाथ चौधरी * सौ.राजश्री मनोज चौधरी * श्री.मुकेश रघुनाथ चौधरी * सौ.पुनम मुकेश चौधरी
श्री. शुभम सतिषराव सव्वालाखे (अमरावती) * सौ.रश्मी शुभम सव्वालाखे *
चि. आर्यन * साक्षी * क्षितिज * सिद्धी * समर्थ * त्रिनय
रविवार दि ३० ऑगस्ट २०२६
वेळ : सकाळी १० वा.
भोजन दुपारी १२.३०ते ३.३० पर्यंत
नामकरण सोहळ्याचे स्थळ : माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी नगर ,पारोळा रोड, हॉटेल शितल च्या मागे, धुळे.

**प्लॉट विकणे आहे**

धुळे जमनागिरी दत्तमंदिर लगतचे २ प्लॉट ओपन स्पेस लागून सुमारे ११००० स्क्वे. फुट प्लॉट विकणे आहे.
-: संपर्क :-
9403532858

**शेती विकणे आहे**

दोंडाईचा तावखेडा ता.शिंदखेडा येथील तापी काठची क्लिअर टायटल शेत जमीन विकणे आहे. गट नं.५३ क्षेत्र २ हेक्टर्स ४७ आर व गट नं.६९/१ क्षेत्र ६२ आर.
-: संपर्क धुळे :-
9403532858

**त्वरीत पाहिजेत**

दुकानात कामासाठी पूर्णवेळ
लेडिज-२
मुले-२
-: संपर्क :-
9423191694

**पाहिजेत**

शतायुषी या नामांकित प्रॉडक्टच्या मार्केटिंगसाठी सेल्समन पाहिजे गरजूंनी त्वरित संपर्क साधावा.
9372811149
9372985822

**विकणे आहे**

वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

**प्लॉट विकणे**

3900 sq.ft. 15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :-
7391055331

**शेती विकणे आहे**

वार शिवारातील गट नं. २६८/४ टकरे तलावाला लागून ४ एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. शेतावर जाणेसाठी कायमस्वरूपी स्वतंत्र रस्ता आहे.
-:संपर्क :-
विलासराव माळी
8888101111

**पाहिजेत**

रेडिमेड कापड दुकानासाठी
१) सेल्समन- २ जागा
२) हेल्पर- १ जागा
(अनुभव असल्यास प्राधान्य)
त्वरित भेटावे
रॉयल मेन्स वेअर
१३०६-ब, आदर्श पुस्तकाल्याजवळ, आग्रारोड, धुळे.
9423916107

**विकणे आहे**

एक हाती वापर, उत्तम कंडीशन XUV 500 कं MH-06-BM-2061 (महिंद्र कं) गाडी विकणे आहे
-: संपर्क :-
9284805199

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
Japan Premium



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV | HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागु
श्री महावीर इलेक्ट्रीक अॅण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०